ePaper

**मराठा आंदोलकांवर लाठीमार दुर्दैवी, उच्चस्तरीय चौकशी करणार: मुख्यमंत्री**



| वर्ष - 7 | अंक - 120 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 2 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- भारत पाकिस्तान सामना रद्द ?
- टायगर श्रॉफचा शानदार डान्स!
- एक देश एक निवडणूक समिती..!
- जालन्यातील लाठीमार दुर्दैवी!

# उद्योगवृद्धी अन् युवकांना संधी!

## » महापालिका प्रशासनाचा संकल्प : आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील उद्योगांनी युवकांना सक्रियपणे प्रशिक्षणार्थी म्हणून संधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करावेत, त्यांना चांगल्या संधी मिळतील याची खात्री करण्यासाठी आणि कंपनीतील उच्च पदांवर त्यांना काम करता यावे यासाठी शहरातील उद्योगांना युवकांच्या प्रशिक्षणासाठी औद्योगिक शिक्षण संस्थेच्या वतीने सहकार्य करण्यात येईल, असे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह म्हणाले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी यांच्या वतीने शहरातील आणि हद्दीलगतच्या विविध औद्योगिक कंपन्यांसमवेत "भारतीय उद्योगांच्या भविष्यातील मागण्या पूर्ण करणारे आयटीआय ट्रेड ओळखणे" या विषयावर वाकड येथील हॉटेल टीप टॉप इंटरनॅशनल येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते.

ही कार्यशाळा आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली व विविध औद्योगिक आस्थापनांचे व्यवस्थापक आणि प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पार पडली. औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या विस्तारीकरण व सुधारणा प्रक्रियेत विविध औद्योगिक आस्थापनांना समावून घेणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, प्रमोद ओंभासे, उप आयुक्त रविकिरण घोडके, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजचे डायरेक्टर एस. एच. कोपर्डेकर, टाटा मोटर्सचे सुशील वारंग, सॅन्डविक टुलिंगचे सचिन पाटील, बॉश रेक्स्रोथ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे मिलिंद तावरे, फोर्ब्स मार्शलचे एचव्ही सिंग आणि प्रसाद वैद्य, महिंद्राचे मंगेश गुंजल आणि स्मिता पानसकर, सँडविक कोरोमंट इंडियाच्या रोशनी आचार्य, जॅक्वारचे पांडुरंग हेलगे आणि क्रिष्णा फरटाले, एस.के.एफ इंडिया लिमिटेडचे मयूर देशमुख, लुकास टीव्हीएस लिमीटेडचे गजानन पाटील, गॅलेक्सी टूलिंगचे सचिन पाटील आदी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, भारतीय उद्योगातील भविष्यातील मागण्या ओळखून पिंपरी चिंचवड शहरात औद्योगिक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका नेहमीच विविध नाविण्यपुर्ण उपक्रम राबवित असते.

पिंपरी चिंचवड शहरात मोरवाडी आणि कासारवाडी या दोन सुस्थापित औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्था व्यावसायिक प्रशिक्षण आणि आवश्यक कौशल्ये प्रदान करित आहेत ज्या युवकांना स्थानिक उद्योगांमध्ये अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी सक्षम करत आहेत. महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध १८ ट्रेड्सचे प्रशिक्षण दिले जाते. उद्योगांमधील विविध क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्य यांच्यामधील समन्वयाचे काम महापालिकेने केले आहे, हा समन्वय राखण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली असून असंख्य युवकांना त्यांच्या करिअरमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तयार केले आहे. विविध क्षेत्रांमध्ये कुशल कामगारांची वाढती मागणी पाहता विविध औद्योगिक अस्थापना वास्तविक जगातील गरजांनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमाला आकार देण्यास मदत करू शकतात.

### ... तर शहरात समृद्धीचे वातावरण

» महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था केवळ सर्वसमावेशकच नाही तर उमेदवारांना विविध क्षेत्रांमध्ये आणि अधिक जबाबदारीच्या पदांवर संधी देखील प्रदान करते. युवकांना घडविण्यासाठी केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे तर सॉफ्ट स्किल्सचेही शिक्षण देणेही तितकेच महत्वाचे असून संवाद कौशल्य, संघटन कौशल्य याचाही सहभाग असणे गरजेचे आहे. उद्योग क्षेत्रात महिला सक्षमीकरणावर तसेच पुरुषप्रधान व्यवसायांमध्ये महिलांना भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यावर आणि औद्योगिक शिक्षण संस्थामध्ये सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण शिक्षण वातावरण निर्माण करण्यावर महापालिका भर देत आहे. युवकांना कौशल्याने सुसज्ज करणे तसेच त्यांना भविष्यात विविध संधी उपलब्ध करून देणे ही शहरातील उद्योगांची जबाबदारी आहे, यामुळे युवकांना संधी मिळून शहरात समृद्धीचे वातावरण तयार होऊ शकते असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

# ‘धन्वंतरी’त महापालिका प्राथमिक शिक्षकांचाही समावेश करा!

## » भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची मागणी : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षक संघटना कृती समितीच्या वतीने धन्वंतरी योजना लागू करण्यासंदर्भात अनेकदा मागणी करण्यात आली. परंतु, प्रशासन या संदर्भात उदासीन आहे. परिणामी, शिक्षकांच्या भावना तीव्र असल्याने तातडीने ही योजना प्राथमिक तथा सेवा निवृत्त शिक्षकांना लागू करावी, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शिक्षण संघटना कृती समितीच्या वतीने गेल्या सात – आठ वर्षांपासून ही योजना प्राथमिक तसेच सेवा निवृत्त शिक्षक यांना लागू करण्यात यावी, यासाठी प्रयत्न करत आहेत. यासाठी अनेकदा कृती समितीच्या वतीने बैठाका, सविस्तर निवेदने देखील देण्यात आली होती. मात्र पालिका प्रशासनाच्या टाळाटाळीने अनेक अनेक शिक्षकांवर वैद्यकीय खर्चाचा भार मोठ्या प्रमाणात पडत आहे. प्राथमिक शिक्षक व सेवा निवृत्त शिक्षक हे दोन्ही आपल्या शिक्षण व्यवस्थेचा कणा आहेत. या दोन महत्वाच्या घटकांना या सुविधेपासून वंचित ठेवणे योग्य नसून यामुळे दोन्ही घटकामध्ये तीव्र असंतोष निर्माण होत आहे. यामुळे पालिका प्रशासनाने या गोष्टीची गांभीर्याने दखल घ्यावी. अन्यथा शिक्षक संघटना कृती समितीच्या वतीने शिक्षण दिनाच्या दिवशी (५ सप्टेंबर) तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

> “ गेल्या सात ते आठ वर्षांपासून हा प्रश्न रखडलेला असून] देखील प्रशासन प्राथमिक शिक्षक व सेवा निवृत्त शिक्षण यांच्या प्रश्नाबाबत अजूनही गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. ‘शिक्षकांच्या एका वर्गाला एक न्याय व दुसऱ्या वर्गाला एक न्याय’ अशी दुटप्पी भूमिका प्रशासनाने घेवू नये. महापालिका आयुक्त आणि शिक्षण विभागाने धन्वंतरी योजनेचा लाभ प्राथमिक शिक्षक आणि सेवा निवृत्त शिक्षकांना द्यावा, अशी आमची मागणी आहे.
>
> – **शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, शहर जिल्हा

# सोसायटीधारकांच्या पिण्याच्या पाण्याची 'हमी' कोण घेणार ?

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सवाल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका बांधकाम विभागातील उदासीनतेमुळे शहरातील सोसायटीधारक नागरिकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. विकासकाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना पाणी पुरवठ्यासह अन्य सोयी-सुविधांसाठी हमीपत्र लिहून घेतले जाते. मात्र, त्याची काटेकोर अंमलजावणी होत नाही. मग, सोसायटीधारकांच्या पाण्याची 'हमी' कोण घेणार? असा सवाल भाजपा आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित केला.**



चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या पुढाकाराने शहरातील सोसायटीधारकांच्या पाणीपुरवठ्याबाबत महापालिका भवनातील आयुक्त दालनात बैठक घेण्यात आली.

यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे व पदाधिकारी व बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. संजीवन सांगळे म्हणाले की, महापालिका हद्दीतील बांधकाम व्यवसायिकाकडून जोपर्यंत भामा आसखेडचा टप्पा क्रमांक पाच आणि सहा पूर्ण होऊन पूर्ण क्षमतेने सोसायटी धारकांना पाणी पुरवणार नाही. तोपर्यंत विकसक सोसायटी धारकांना स्वखर्चाने पाणी पुरवतील, असे हमीपत्र विकासकांच्या प्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना लिहून दिले जाते. परंतु, कोणताही विकसक स्वखर्चाने सोसायटीला पाणी पुरवत नाही. असे हमीपत्र लिहून देऊन त्याचे उल्लंघन करणाऱ्या विकासावर कलम 200 नुसार माननीय आयुक्तांनी फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही सांगळे यांनी केली.

> हमीपत्राप्रमाणे बांधकाम व्यावसायिक पाणीपुरवठा करत नसतील आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाही पाणीपुरवठा करत नसेल, तर हा सोसायटीधारकांवर अन्याय आहे. त्यामुळे हे सर्व सोसायटीधारक लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडे येतात. त्यामुळे आयुक्तांनी या बांधकाम व्यवसायिकाकडून हमीपत्र लिहून घेताना काळजी घ्यावी तसेच सोसायटीधारकांना एक तर बांधकाम व्यवसायिकांनी किंवा महानगरपालिकेने पाणी पुरवावे. आजपर्यंत सोसायटीधारकांनी विकत पाणी घेतलेले आहे त्या पाण्याबद्दल प्रशासनाने तोडगा काढून सोसायटीधारकांना न्याय द्यावा, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.
>
> **- महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

### बैठकीत केल्या मागण्या पुढीलप्रमाणे...

» बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेताना विकसकाने महानगरपालिकेला हमीपत्र लिहून दिल्यानंतर त्या विकसकाने सदनिका धारकांच्या बरोबर करारनामा करताना त्यामध्ये सदनिका धारकांनी स्वतः पाणी खरेदी करावे असे लिहून घेऊ नये. महानगरपालिकेकडे पुरेसे पाणी नसेल किंवा इतर मूलभूत सुविधा नसतील तर यापुढे कोणत्याही बांधकाम व्यवसायिकास बांधकाम परवाने देऊ नयेत. ज्या बांधकाम व्यावसायिकांनी पार्ट कम्प्लिशन, भाग पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे. ग्राहकांच्या करारनाम्यामध्ये लिहून दिलेल्या गोष्टींची पूर्तता केली नसताना देखील, महानगरपालिकेच्या नियमाची पूर्तता केलेली नसताना देखील, भाग पूर्णत्वाचे दाखले दिलेले आहेत अशा सर्व गृह प्रकल्पाची यादी फेडरेशनकडून माननीय आयुक्तांना दिली जाईल. एकच विकासक अनेक गृहप्रकल्पामध्ये हमी पत्राचे वारंवार उल्लंघन करत असेल, तर प्रशासनाने तात्काळ कारवाई केली पाहिजे, अशी मागणी फेडरेशनच्या माध्यमातून करण्यात आली. यावर कायदेशीर बाजुंची पडताळणी करुन निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन आयुक्त सिंह यांनी दिले आहे.

---

# व्यावसायिक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांचे सर्वेक्षण करा !

## राष्ट्रवादीचे अजित गव्हाणे यांची मागणी : आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात व्यावसायिक ठिकाणी तसेच दुकानात राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झालेला आहे. त्यांना व्यावसायिक ठिकाणी अकस्मात होणाऱ्या अपघातांपासून बचाव करता यावे, तसेच त्यांना राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था करता यावी, यासाठी अशा लोकांचे सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.**



याबाबत दिलेल्या निवेदनात गव्हाणे यांनी शहरात वरचेवर व्यावसायिक ठिकाणी राहत असणाऱ्या लोकांबाबत घडत असलेल्या अपघातांचा आढावा घेतला आहे. अशा धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे त्यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे, असे गव्हाणे म्हणाले.

ते म्हणाले की, 'शहरातील पूर्णानगर, चिंचवड येथील सचिन हार्डवेअर अँड इलेक्ट्रिकल्स दुकानाला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यापूर्वीही २३ फेब्रुवारी २०२१ मध्ये आकुर्डी प्राधिकरण येथील म्हाळसकांत चौकाजवळ जयहिंद चौकात घरातच बनवलेल्या सारडा क्लॉथ सेंटर या कपड्यांच्या दुकानाला लागलेल्या आगीत एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला होता. पुणे शहरातही यापूर्वी असेच कपड्याच्या दुकानात लागलेल्या आगीमध्ये कामगारांचा मृत्यू झाल्याचे घटना घडली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील दुकानात अथवा व्यायसायिक ठिकाणीच राहणाऱ्या कुटुंबाचे सर्व्हेक्षण करून पुढील उपाययोजना तातडीने लागू करायला हवेत.' असेही अजित गव्हाणे यांनी म्हटले आहे.

### बैठकीत केल्या मागण्या पुढीलप्रमाणे...

» आपल्या निवेदनात गव्हाणे पुढे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी १८ फूट वा त्याहून अधिक उंचीचे गाळे बांधण्यात आल्याचे दिसतात. अशावेळी बाहेरील राज्यातून आलेली अनेक कुटुंबे या दोन मजली दुकानांमध्येच वरती पोटमाळा बनवून त्यामध्ये घरगुती वापरासाठी किंवा राहण्यासाठी उपयोग करतात. दुकानांमध्ये जास्तीचा वेळ देता यावा आणि राहण्यासाठी वेगळे भाडे जाऊ नये यासाठी काटकसर म्हणून ते पोटमाळ्याचा उपयोग राहण्यासाठी करतात. मात्र, आपत्तकालीन परिस्थितीमध्ये आग लागून अथवा अन्य अपघाताने नागरिकांच्या जीवास धोका होताना दिसत आहे. यासाठी महापालिकेने बांधकाम परवाना विभाग, करसंकलन विभाग तसेच संबंधित इतर विभागांशी समन्वय साधून पिंपरी चिंचवड शहरातील व्यावसायिक जागेत राहणाऱ्या नागरिकांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत व पुढील उपाययोजना कराव्यात, अशी मागणी गव्हाणे यांनी केली.

# बैठक अजितदादांची...हवा महेशदादांची!

## राष्ट्रवादीला आत्मचिंतनाची गरज : शहराच्या कारभारात भाजपाच 'सुपरपॉवर'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचे एकेकाळी "अनभिषिक्त कारभारी" असलेले अजित पवार राज्यातील महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे भाजपाचे स्थानिक नेते कोंडीत सापडतील किंबहुना आमदार महेश लांडगे यांचा 'करेक्ट कार्यक्रम' होईल, असा दावा राजकीय विश्लेषक आणि जाणकारांमधून व्यक्त केला जात होता. मात्र, या चर्चा निव्वळ फार्स ठरल्या आहेत. शहराच्या कारभारामध्ये भाजपाच 'सुपर पॉवर' राहील, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**








राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडला दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी २०१७ मध्ये सुरूंग लावला. राष्ट्रवादीतील मोठा गट या दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वात भाजपात दाखल झाला. राष्ट्रवादीला पराभव पत्करावा लागला.

विरोधी पक्षात असल्यामुळे माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, संजोग वाघेरे-पाटील, भाऊसाहेब भोईर या ज्येष्ठांसह आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांच्यासारख्या दुसऱ्या फळीतील नेत्यांना नेतृत्व विकसित करण्याची संधी निर्माण झाली होती. मात्र, त्यांना अपेक्षीत यश मिळाले नाही.

राष्ट्रवादीची संपूर्ण भिस्त ही अजित पवार यांच्यावर असल्यामुळे शहरातील स्थानिक नेते कायम परावलंबी राहिले. दिवंगत लक्ष्मण जगताप किंवा आमदार महेश लांडगे यांच्या विकासकामांवर टीका-टीपण्णी आणि आरोप करण्याशिवाय काहीही साध्य करता आले नाही.

### अजित पवारांचा सावध पवित्रा...

महापालिका भवनात अजित पवार यांनी सुमारे अडीच तास बैठक घेतली. आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्यासह महत्त्वाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत तब्बल ७५ मिनिटे केवळ भोसरी विधानसभा मतदार संघातील विकासकामांवर चर्चा झाली. बैठकीत उपस्थित राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी भाजपा किंबहूना आमदार लांडगे यांच्या पुढाकाराने सुरू असलेली विकासकामे कशी चुकीची आहेत? यावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. अजित पवार याबाबत तडकाफडकी निर्णय घेतील, अशीच अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. "चुकीची कामे होवू देणार नाही. सर्व लोकप्रतिनिधींची कामे करा.." तसेच, "विलास तू महेशशी जुळवून घे..." असा सावध पवित्रा त्यांनी घेतला. त्यामुळे शहरातील राजकीय विश्लेषक आणि जाणकारांनी अजित पवार यांच्या सरकारमधील सहभागानंतर शहर भाजपाची किंबहूना महेश लांडगे यांची 'मोठी कोंडी' होईल. याबाबत जो राजकीय फुगा निर्माण केला होता. तो फुटला आहे.

### मविआत शक्य झाले नाही, तर महायुतीत कसे होईल?

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता अडीच वर्षे राहिली. या सरकारमध्ये अजित पवार उपमुख्यमंत्री होते. त्यांच्याकडे पुणे जिल्ह्याचे किंबहूना निर्णयाचे सर्वाधिकार होते. या काळातही पवार यांनी एकदा महापालिकेत 'मॅरेथॉन बैठक' घेतली. चौकशीचे आदेश दिले. पुढे काय झाले? हे सर्वज्ञात आहे. आता महायुतीच्या माध्यमातून अजित पवार पुन्हा उपमुख्यमंत्री आहेत. यावेळीही त्यांनी चौकशी करू... असे सांगितले. पण, काय होणार? हे सांगण्यासाठी ज्योतिषाची आवश्यकता नाही. राज्यातील राजकारणाचा विचार केला असता अजित पवार यांच्या अर्थ खात्याच्या सर्व फाईल्स उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर आधी जातील. त्यांनी त्यावर शेरा करुन त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जाणार आणि मगच निर्णय होणार आहेत, असा अध्यादेश जाहीर करण्यात आला. याचा अर्थ अजित पवार यांच्याकडे सर्वाधिकार नाहीत. त्यांनी निर्णय घेतला तरी फडणवीसांच्या मर्जीशिवाय काहीही होणार नाही. मग, महाविकास आघाडीच्या काळात निर्विवाद सत्ता असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आमदार महेश लांडगे यांना 'कैची'त पकडून शकली नाही, ती महायुतीच्या सत्तेत कशी काय पकडणार? असा प्रश्न उपस्थित होतो.

### संधी असतानाही राष्ट्रवादीचे अपयश...?

» महाविकास आघाडीची सत्ता असताना शहरात राष्ट्रवादीला मोठी संधी होती. भोसरी मतदार संघामध्ये माजी आमदार विलास लांडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, चिंचवडमध्ये माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि पिंपरी मतदार संघात आमदार अण्णा बनसोडे यांना विकासकामे मार्गी लावता आली असती. मात्र, तसे झाले नाही. अजित पवार यांच्या बैठकीत भोसरीतील विकासकामांवर 'फोकस' दिसला. याचा उलट अर्थ भोसरीत विकासकामे झाली आहेत, असाच होतो. अजित पवार यांनी "सर्व लोकप्रतिनिधींची कामे करा... तसेच, समतोल विकास झाला पाहिजे..." अशी सूचना प्रशासनाला केली. त्यामुळे पिंपरीत पक्षाचा आमदार असताना आणि चिंचवडमध्ये लाख-दीड लाख मतदार पाठिशी असतानाही लक्षवेधी विकासकामे करता आली नाहीत किंवा करुन घेता आली नाहीत, यावर शिक्कामोर्तब होते. हे राष्ट्रवादीचे अपयश नव्हे काय? यावर स्थानिक नेत्यांनी चिंतन करणे अपेक्षीत आहे.

### शहरात भाजपाच 'सुपर पॉवर'...

» राष्ट्रवादी आणि अजित पवार यांच्या सत्ता सहभागामुळे भाजपाची राजकीय अडचण होईल किंवा भाजपा 'बॅकफूट'वर गेली तसेच आगामी निवडणुकीत जागावाटपामध्ये 'कोंडी' होईल असा दावा केला जात होता. परंतु, राज्य सरकारमध्ये वातावरण बदलले. नव्या जीआर नुसार अजित पवार यांच्या निर्विवाद अधिकारांना मार्यादा आल्या आहेत. जसे अजित पवार यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये बारीक लक्ष आहे. तितकेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचेही आहे. कारण, अजित पवार यांच्या पत्रकार परिषदेत सुरवातीची १५ मिनिटे त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तोंडभरुन कौतूक केले. त्यांच्या बदलेल्या कार्यशैलीचा विचार केला, तर अजित पवार यांना पूर्वीप्रमाणे 'एक घाव दोन तुकडे' अशी कार्यपद्धती अवलंबता येणार नाही. भाजपाशी जुळवून घ्यावे लागणार आहे. कारण, बैठकीत चर्चा करण्यात आलेले बहुतेक विषय दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी हातात घेतलेले होते. पुनावळे कचरा डेपोबाबत महिनाभरापूर्वीच आमदार अश्विनी जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. भाजपाचेच विषय लावून धरल्यामुळे स्थानिक पातळीवर भाजपाच 'सुपर पॉवर' राहणार हे निश्चित झाले आहे. यासोबतच, आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे आणि शहराध्यक्ष शंकर जगताप या मंडळींचा शहराच्या निर्णयांमध्ये वरचष्मा राहणार आहे.

---

# देहूरोडमध्ये १५ वर्षीय विद्यार्थ्याची आत्महत्या

## मृतदेह लोहमार्गालगत आढळला; आत्महत्येचं मूळ कारण मात्र अद्यापही अस्पष्ट

। देहूरोड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवडलगतच्या देहूरोडमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. दहावीतील विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. रेल्वेसमोर येऊन त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. बुधवारी ३० ऑगस्टच्या रात्री सव्वा दहाच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. आत्महत्येपूर्वी त्याने मित्राला मोबाईलवर मेसेज पाठवत आपण आत्महत्या करत असल्याचं कळवलं अन त्यानंतर तासाभरात त्याचा मृतदेह लोहमार्गालगत आढळला. आत्महत्येचं मूळ कारण मात्र अद्यापही अस्पष्ट आहे.**




देव कुमार असं या पंधरा वर्षीय मुलाचं नाव होतं. तो देहूरोडच्या लष्करातील एएसआय अधिकाऱ्याचा मुलगा होता. देवला मोबाईल गेमिंगचा ही छंद होता, त्यातून तो अनेक चॅलेंज ही स्वीकारायचं अशी माहिती त्याच्या मोठ्या भावाने पोलिसांना दिली.

### आत्महत्येचं मूळ कार अद्याप अस्पष्ट...

» देव कुमारचं कुटुंब हे मूळचं मथुरा येथील आहे. त्याची आई कामानिमित्त मथुऱ्याला गेली होती, वडील ड्युटीवर होते. तर दोन्ही भाऊ घरात होते. त्यावेळी देवने मित्राला आत्महत्या करत असल्याचा मेसेज केला अन् पुढच्या तासाभरात त्याने लोहमार्ग गाठलं. धावत्या रेल्वेसमोर येऊन त्याने जीव दिला. देवने आत्महत्या का केली, याचं मूळ कारण अजूनही स्पष्ट झालेलं नाही. त्या कारणाचा शोध रेल्वे पोलीस घेत आहेत. रेल्वे पोलिसांनी देवचा मृतदेह कुटुंबीयांकडे दिल्यानंतर ते पुढील विधींसाठी मथुऱ्याला गेले आहेत.




**इंडिया आघाडीची मुंबईत बैठक सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर दोन बातम्या आहेत. एक म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' या नव्या युतीपेक्षा भारतीय जनता पक्षच आघाडीवर असणार आहे. दुसरी बातमी 'इंडिया' आघाडीला महत्त्वाच्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये लोकांमधून समर्थन मिळत आहे. किमान काही गंभीर मुद्द्यांवर सत्ताविरोधी वातावरण निर्माण होत आहे.**

# 2024 मध्ये खरी परीक्षा काँग्रेसचीच

गेल्या महिन्यात झालेल्या दोन देशव्यापी सर्वेक्षणातून आलेल्या या बातम्या. एक सर्वेक्षण सीएनएक्सने इंडिया टीव्हीसाठी केले तर दुसरे सीव्होटर फॉर इंडिया टुडेने. लोकसभेची निवडणूक आज झाली तर काय होऊ शकते, अशा पद्धतीने त्यांनी अंदाज वर्तवले आहेत. त्यात भाजपचे स्पष्ट पण कमी झालेले बहुमत दिसते. २९२ लोकसभा मतदारसंघांमधील ४४,५०० हून अधिक मतदारांच्या सर्वेक्षणाच्या आधारावर, सीएनएक्सने राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) ३१८ जागा मिळतील असा अंदाज वर्तवला आहे. त्यात एकटय़ा भाजपला २९०, आणि इंडियाला १७५, काँग्रेसला ६६ जागा मिळतील, असे म्हटले आहे. तर सीव्होटरने जुलैपासून ते ऑगस्टच्या मध्यापर्यंत सर्व ५४३ लोकसभा मतदारसंघांमध्ये जवळपास २६ हजार लोकांची मते विचारात घेतली. त्यातून दिसते की



एनडीएला ३०६ जागा (भाजप २८७) आणि 'इंडिया'ला १९३ (काँग्रेस ७४) जागा मिळतील. प्रत्यक्ष मतदानाच्या नऊ महिने आधी वर्तवलेला अंदाज केवळ सूचक असू शकतो.

त्यात मोठय़ा संख्येने लोकांची मते विचारात घेतली असली तरी, कार्यपद्धती आदर्श नाही. सीव्होटरचे सर्वेक्षण फोनवर केले गेले. भेटून समोरासमोर चर्चा करण्याला फोनवरची चर्चा हा काही फार चांगला पर्याय असू शकत नाही. तर सीएनएक्सला त्यांची सर्वेक्षणाची कार्यपद्धती स्पष्ट करण्याची गरजच वाटत नाही. तरीही, या सर्वेक्षणातील निष्कर्ष 'इंडिया'च्या नेत्यांना चार व्यापक धडे देतात. पहिली गोष्ट, भाजप दिसतो त्यापेक्षा जास्त असुरक्षित आहे. सीव्होटरच्या मते, एनडीएला या क्षणी राष्ट्रीय पातळीवर ४३ टक्के मते मिळतील तर 'इंडिया' आघाडीच्या पक्षांचा एकत्रित मतांचा वाटा केवळ ४१ टक्के असेल. सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की भाजपचे वर्चस्व असलेल्या राज्यांमध्ये 'इंडिया'आघाडीला काही मोठे आणि अनेक छोटे फायदे मिळू शकतात. महाराष्ट्र आणि बिहारमधून 'इंडिया'ला मोठा फायदा होऊ शकतो. तिथे विरोधकांची आघाडी आधीच आहे. दोन्ही सर्वेक्षणांमध्ये महाराष्ट्रातील विभाजनामुळे एनडीएचे १७ ते २१ जागांचे नुकसान दिसते आहे. बिहारमध्येही एनडीएचे किमान १५ जागांचे नुकसान होऊ शकते. त्याशिवाय पश्चिम बंगाल, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये 'इंडिया' आघाडीला काही जागा मिळतील, त्याचा भाजपच्या जागांवर परिणाम होईल, असे हे सर्वेक्षण सांगते. हे नुकसान भरून काढण्यासाठी, भाजपला जिथे पक्षाला स्थान नाही, अशा काही राज्यांमध्ये जागा वाढवाव्या लागतील.

पण सर्वेक्षणात केरळ, आंध्र प्रदेश, पंजाब आणि तमिळनाडू (मित्रपक्षांचा थोडासा फायदा वगळता) या राज्यांमध्ये भाजपच्या हाताला काही लागणार नाही आणि ओडिशा आणि तेलंगणामध्ये तर काहीच मिळणार नाही. त्यामुळे भाजपच्या रणनीतीकारांनी काळजी करावी अशी परिस्थिती आहे. दुसरे, म्हणजे विरोधी पक्षांना परिस्थितीचा कधी आणि कसा उपयोग करून घ्यायचा हे समजत असेल तर सत्ताविरोधी वातावरण वाढत आहेआणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या (६३ टक्के) कामगिरीला मान्यता दिली. निम्म्याहून अधिक मतदारांनी (५२ टक्के) पंतप्रधानपदासाठी मोदींना पसंती दिली. त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी असलेल्या राहुल गांधी यांनी 'भारत जोडो यात्रे'नंतरही १६ टक्के एवढीच पसंती मिळाली. त्यामुळे या टप्प्यावर मोदी विरुद्ध राहुल अशा लढतीला प्राधान्य देणे विरोधकांसाठी मूर्खपणाचे ठरेल. त्याचबरोबर, लोकशाही, जातीय सलोखा, अल्पसंख्याकांची सुरक्षा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे मुद्दे वातावरण बदलवणारे असण्याची शक्यता नसली तरी विशेषत: अल्पसंख्याकांमध्ये या मुद्द्यांना या आधी नव्हते तेवढे महत्त्व आले आहे. हे विचित्र असले तरी, परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवर मोदी सरकारला अनुकूल मते (७० टक्के) दिली गेली आणि चीनच्या सीमेवरील घुसखोरी आपण समाधानकारकपणे हाताळली हे मोठय़ा लोकसंख्येला (७९ टक्के) पटवून देण्यात सरकार यशस्वी ठरले.

## संपादकीय »

### 'अण्णा' कोण?

***सशक्त विरोधी पक्ष हवा, हे खरेच. सशक्त विरोधी पक्ष हा सुदृढ सत्ताधाऱ्यांस दांडगाई करू देत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्या सत्ताधारी असलेला भाजप.***

संपूर्ण देश असो वा महाराष्ट्रासारखे एखादे राज्य. भाजपने विरोधी पक्षाची भूमिका मन लावून केली. ते पाहूनच विरोधी पक्षांत बराच काळ काढलेल्या भाजपस मतदारांनी सत्तासंधी दिली. पण ती साधल्यानंतर मात्र जे कार्य आपण नेटकेपणाने केले ते अन्य कोणास करताच येऊ नये, अशा प्रकारचे राजकारण भाजपने केले. आपले राजकीय विरोधक आणि टीकाकार यांच्याबाबत भाजपची वर्तणूक सहिष्णुतेच्या अभावाची निदर्शक होती या आरोपात तथ्य नाही, असे म्हणता येणार नाही. त्याचा परिणाम असा की एके काळी भाजपपेक्षाही अधिक तगडय़ा काँग्रेसविरोधात विरोधकांची एकी होण्यासाठी पाच दशके जावी लागली; पण भाजपला, त्यातही नव्या भाजपस.. मात्र यासाठी जेमतेम दहा वर्षे पुरली. विरोधकांस एकमेकांजवळ आणण्यासाठी काँग्रेसला आणीबाणी लादावी लागली. भाजपस त्याची गरजच लागली नाही.

**प्रामुख्याने ती राजकीय प्रक्रियाच असते, कारण प्रत्येक नवतेत हितसंबंधांची नव्याने जुळवणूक घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. चार्वाकांचा रोकडा देहात्मवादी विज्ञानवाद, बुद्ध-महावीरांचा शांती-प्रज्ञा-शील-करुणा व अहिंसेचा विचार, संतांचा मानवतावाद, १९ व्या शतकातील सुधारणावाद, स्वतंत्र भारतात नेहरूंच्या नेतृत्वाखाली आधुनिक भारताची केलेली रचना; यात प्रत्येक टप्प्यावर नव्या भारताची मांडणी करण्यात आली आहे.**

# भारतात मुस्लिमांचे राजकीय स्थान काय?

मोदींच्या नेतृत्वाखालील विद्यमान भारतही याला अपवाद नाही. २०१७ च्या स्वातंत्र्यदिनी राष्ट्राला संबोधित करताना मोदींनी पहिल्यांदा 'न्यू इंडिया'च्या कल्पनेचा उच्चार केला तेव्हापासून संघ-भाजपच्या वर्तुळात सातत्याने नवीन भारताची संकल्पनात्मक मांडणी केली जात आहे. नवीन भारताची धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने खूप परिश्रम घेतले. नव्या भारताचे हे कथानक भाजपला अनेक अर्थांनी किफायतशीर ठरत आहे. उदा.- भाजपाचा हा राजकीय प्रकल्प एकीकडे पक्षाच्या नेहरू आणि काँग्रेसवरील टीकेला वैधानिकता मिळून देतो, तर दुसरीकडे वेगवेगळ्या समुदायांत राजकीय समावेशनाच्या प्रक्रिया गतिमान करून मतांची बेगमी करून घेण्यासाठी अनुकूल ठरतो. तिसरीकडे भारत बदलत असल्याचा दावा करून नवउदारमतवादी भांडवलशाही शक्तींना विश्वगुरू म्हणून भारताची दखल घेण्यास भाग पाडले जात आहे, असे सांगितले जाते. 'चंद्रयान-३'



च्या यशाने या दाव्याला अधिक पुष्टी मिळाली आहे. तथापि, भाजपकृत नव्या भारताच्या संकल्पनेत अनेक विसंगतीही आहेत, ज्या नजरेआड केल्या जाऊ शकत नाहीत.

भाजपच्या नव्या भारताचे नेमके स्वरूप काय आहे? राजकीय समावेशनाच्या नव्या शक्यता त्यामुळे निर्माण झाल्या आहेत का? मुस्लीम राजकीय प्रतिनिधित्वाच्या पेचाला नवभारताची संकल्पना कसा प्रतिसाद देते? राजकीय प्रक्रियेचे कोणते नवे आकृतीबंध त्याद्वारे जुळून येत आहेत? याचे विश्लेषण करण्याचा अल्पसा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे. 'न्यू इंडिया' हा मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपचा महत्त्वकांक्षी राजकीय प्रकल्प आहे. राजकीय दृष्टिकोनातून भाजपच्या नव्या भारताचे 'डीकोडिंग' करणाऱ्यांना हा प्रकल्प संघ भाजपच्या जुन्याच हिंदुत्ववादी नीतीचा विस्तार वाटण्याची दाट शक्यता आहे. परंतु हे पूर्ण सत्य नाही. भाजपच्या सध्याच्या नवभारताच्या संकल्पनेत बदलत्या परिस्थितीचे व्यावहारिक भान आहे. तथापि तिचा मध्यवर्ती आशय 'हिंदुत्व' हाच आहे. ३० मे २०२२ रोजी एका लेखात गृहमंत्री अमित शहा यांनी लवचिक, मजबूत, सक्षम आणि आत्मनिर्भर असे नवीन भारताचे वर्णन केले आहे. पंतप्रधान मोदींचा हा आवडता प्रकल्प आता प्रत्यक्षात साकार होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यात भारताने कोविडवर यशस्वी मात केल्याचा उल्लेख आहे. अर्थव्यवस्था प्रगतीपथावर असल्याचा दावा आहे. व्यवसाय सुलभ करण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख आहे. 'सबका साथ, सबका विकास'चा पुनरुच्चार आहे. समाजातील सर्व घटकांना लाभदायक ठरतील अशा घोषणा, योजना व पॅकेजेसची यादी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जालन्यातील लाठीमार दुर्दैवी!

## » जनतेने शांतता राखावी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालन्यातील अंतरवाली सराटी येथे झालेला लाठीमार दुर्दैवी असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे. जनतेला शांततेचे आवाहनही शिंदेंनी केले आहे. सोशल मीडियावरील पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, 'जालना जिल्ह्यातील अंतरवली येथे मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनातील आंदोलकांवर झालेल्या लाठीमाराची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडून या घटनेची माहिती घेतली असून चौकशीचे आदेश दिले आहेत, जनतेने शांतता राखावी.'**

अंबादास दानवे म्हणाले की, 'जालन्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा समाजाचे आंदोलन मोडून काढण्यात पोलिसांनी बळाचा, बेछूट लाठीचा वापर केला आहे. हवेत गोळीबारही केल्याचे वृत्त आहे. याचा मी निषेध करतो. शांततेत आंदोलन सुरू असताना ते दडपण्यासाठी केलेली ही कृती कोणाच्या सांगण्यावरून केली गेली याचे उत्तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यायला हवे.' जालन्यात मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्यानंतर संतप्त झालेल्या आंदोलकांनी धुळे-सोलापूर महामार्गावर काही वाहने पेटवल्याची घटना समोर आली.

यानंतर मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांनी संतप्त लोकांना शांततेचे आवाहन केले आहे. लोकांनी शांतता बाळगावी, आंदोलनाला गालबोट लागेल असे वागू नये असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले आहे. एका वृत्तवाहिनीसोबत दूरध्वनीवरून बोलताना जरांगे पाटील यांनी हे आवाहन केले आहे. सुप्रिया सुळेंनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, 'मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलीसांनी लाठीचार्ज केला. हे अतिशय संतापजनक



आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भुलथापा देऊन भाजपाने मते घेतली परंतु आरक्षणाच्या बाबतीत मराठा समाजाला केवळ आश्वासने देण्यापलीकडे भाजपाने काहीही केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मराठा, धनगर, लिंगायत आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत आमची भूमिका स्पष्ट आहे. परंतु भाजपाने यासंदर्भात सातत्याने संभ्रम वाढविणारी भूमिका घेतली. केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचे, विचारांचे सरकार असूनही आरक्षण दिले जात नाही हि खेदाची बाब आहे.मराठा समाजाच्या आंदोलनकर्त्यांवर लाठिहल्ला करुन भाजपा सरकारने समाजाची क्रूर फसवणूक केली आहे. भाजपाने मराठा समाजाची याबद्दल माफी मागितली पाहिजे. या लाठीहल्ल्याच निषेध.' रोहित पवार यांनीही या घटनेवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, 'जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावातील मराठा समाजाचे आंदोलन उधळण्यासाठी अमानुषपणे लाठीचार्ज करणाऱ्या राज्य सरकारचा जाहीर निषेध. राज्य सरकारला सत्तेची मस्ती चढली असून सत्तेच्या मस्तीतूनच सरकार असा लाठीचार्ज करत आहे.

आता या मस्तवाल आणि घमेंडिया सरकारची मस्ती उतरवण्याची वेळ आली आहे.' विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की, 'आजचा लाठीहल्ला हा सरकारचा क्रूरपणा आहे. या घटनेचा निषेध करतो. मराठा समाजाला आरक्षण देतो म्हणून त्यांची फसवणूक करण्याचे काम या सरकारने केले आहे.५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवल्याशिवाय आरक्षण देता येणार नाही, हे माहिती असताना सुद्धा खोटे बोलवून मत घेतली.. हक्कासाठी रस्त्यावर उतरणे गुन्हा नाही. मराठा समाजाला फसवणाऱ्यांना मराठा समाज माफ करणार नाही. सरकारने मराठा समाजाची माफी मागितली पाहिजे. ज्यांनी कार्यकर्त्यांना मारहाण करून जखमी केले त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.' अशोक चव्हाण म्हणाले की, 'मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सराटी अंतरवाली, ता.अंबड, जि. जालना येथे सुरू असलेले मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन अमानुष पद्धतीने मोडून काढण्याच्या राज्य सरकारच्या कृतीचा मी तीव्र निषेध करतो. आंदोलनावर पोलिसांनी बेछूट लाठीमार करून अश्रुधुराचाही वापर केल्याची धक्कादायक माहिती समोर येते आहे. सोशल मीडियावर येणाऱ्या व्हीडीओतून बळाचा अतिरेक स्पष्टपणे दिसून येतो. मराठा आरक्षण प्रकरणी राज्य सरकारने समाजाचा अंत पाहू नये. या गंभीर प्रश्नावर केवळ वेळकाढूपणा होत असल्याने समाज संतप्त आहे. बळाचा वापर करून हे आंदोलन चिरडता येणार नाही. त्याऐवजी मराठा आरक्षण कसे देणार, याबाबत राज्य सरकारने स्पष्ट भूमिका जाहीर करावी आणि ठोस पावले उचलावीत. नेमके हेच केले जात नसल्याने मराठा समाजातील आक्रोश तीव्र होतो आहे. मराठा आरक्षण देण्यासाठी इंद्रा साहनी व अन्य न्यायालयीन प्रकरणातील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा शिथिल करण्याची आवश्यकता आहे.

### नेमके काय झाले ?

» जालन्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे त्यांच्या काही सहकाऱ्यांसह उपोषण सुरु होते. आरक्षण थेट जाहीर करावं, अशी त्यांची मागणी होती. या दरम्यान त्यांची प्रकृती खालावत चालली होती. त्यामुळे अनेकांनी त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. पण ते उपोषणावर ठाम होते. या आंदोलनात अनेक गावकरी आणि संघटना सहभागी झाले होते. हे आंदोलक गेल्या तीन दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत होते. त्यांची शुक्रवारी पोलिसांसोबत बाचाबाची झाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अचानक लाठीमार सुरू केला. या घटनेमुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे.

# बळाचा वापर करण्याची काहीही गरज नव्हती!

## » गृहमंत्र्यांच्या मनातील भावना कृतीतून दिसली : शरद पवार

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जालन्याच्या अंतरवाली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार केला आहे. हे आंदोलक गेल्या तीन दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत होते. त्यांची शुक्रवारी पोलिसांसोबत बाचाबाची झाली.**

त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अचानक लाठीमार सुरू केला. या घटनेमुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे. शरद पवार म्हणाले की, राज्याच्या गृहमंत्र्यांच्या मनात काही घटकांबद्दलची जी भावना आहे ती पोलिसांच्या कृतीतून व्यक्त होत असते. हे चित्र जालन्यात दिसले आहे. यात पोलिसांना काय दोष द्यायचा. पोलिसांना वरच्या पातळीवरून अशा सूचना आल्या आणि त्यांनी कामगिरी केली. जालन्यातील उपोषण



आंदोलनावर झालेल्या पोलिसी कारवाईविरोधात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी संताप व्यक्त केला. उपोषण थांबवावे असा पोलिसांचा आग्रह होता. आंदोलक आणि पोलिसांमध्ये चर्चा झाली होती. आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते.

> खरे म्हणजे एकदा चर्चा केल्यानंतर लाठीहल्ला किंवा बळाचा वापर करण्याची काहीही गरज नव्हती. मात्र, हल्ली अशा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे कुठलेही प्रश्न असले आणि ते उत्तर न मिळाल्याने रस्त्यावर आले तर बळाचा वापर करावा, अशी राज्याच्या गृहमंत्र्यांची सूचना असावी. भाजपा सरकारने समाजाची क्रूर फसवणूक केली आहे.
>
> - शरद पवार

त्यानंतर काही कारण नसताना लाठी हल्ला झाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले. गृह खात्याकडून अशी अतिरेकी भूमिका घेणे चुकीचे आहे. या लाठी हल्ल्याचा आपण निषेध करत असल्याचे पवार यांनी म्हटले.शरद पवार म्हणाले की, या घटनेचा मी तीव्र निषेध करतो. हे थांबवले नाही, तर मला त्या ठिकाणी जाऊन त्या लोकांना धीर द्यावा लागेल. तसेच या लोकांची

# एक देश एक निवडणूक समिती स्थापन!

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद असतील अध्यक्ष!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्र सरकारने एक देश एक निवडणूक यासाठी समिती स्थापन केली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना त्याचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. त्याची अधिसूचना आज जारी होऊ शकते. केंद्र सरकारने 18 सप्टेंबर ते 22 सप्टेंबरदरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. एक देश, एक निवडणूक यावरही सरकार विधेयक आणण्याची शक्यता आहे.**



केंद्राने स्थापन केलेली समिती वन नेशन वन इलेक्शनच्या कायदेशीर बाबी पाहणार आहे. शिवाय यासाठी सर्वसामान्यांचे मतही घेतले जाणार आहे. दरम्यान, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा कोविंद यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. मात्र, या भेटीचे कारण समोर आलेले नाही. येथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी म्हणाले की, सरकारला अचानक एक देश एक निवडणुकीची गरज का पडली? दुसरीकडे, काँग्रेस नेते आणि छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री टीएस सिंहदेव म्हणाले - वैयक्तिकरीत्या मी एक देश एक निवडणुकीचे स्वागत करतो. ही नवीन कल्पना नाही, जुनी कल्पना आहे. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये सांगितले की, 18 ते 22 सप्टेंबरदरम्यान दोन्ही सभागृहांचे विशेष अधिवेशन होणार आहे. 17 व्या लोकसभेचे हे 13 वे आणि राज्यसभेचे 261 वे अधिवेशन असेल. यामध्ये 5 बैठका होणार आहेत. अधिवेशन बोलवण्यामागे कोणताही अजेंडा नसल्याचेही जोशी म्हणाले. त्यांनी माहितीसोबत जुन्या संसद भवनाचा फोटोही शेअर केला आहे. हे अधिवेशन जुन्या संसद भवनापासून सुरू होऊन नव्या सभागृहात संपेल, असे मानले जात आहे. वर्षभरात संसदेची 3 अधिवेशने होतात. अर्थसंकल्प, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशन. पावसाळी अधिवेशन 20 जुलै ते 11 ऑगस्टपर्यंत चालले. पावसाळी अधिवेशनाच्या तीन आठवड्यांनंतर विशेष अधिवेशन बोलवण्याची घोषणा करण्यात आली आहे. पावसाळी अधिवेशनानंतर 37 दिवसांनी विशेष अधिवेशन होणार आहे. हिवाळी अधिवेशन नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. महिलांना 33% आरक्षण देण्याऐवजी सरकार त्यांच्यासाठी लोकसभेच्या 180 जागा वाढवू शकते.अशी व्यवस्था 1952 आणि 1957 च्या निवडणुकीत SC-ST जागांसाठी होती. त्यावेळी 89 आणि 90 जागांवर एकापेक्षा जास्त उमेदवार निवडून आले होते. नंतर सीमांकन झाल्यामुळे ही व्यवस्था संपुष्टात आली. सध्या ज्या जागांवर मतदारांची संख्या 20 लाख ओलांडली आहे त्या जागांवर एक सर्वसाधारण आणि एक महिला उमेदवार निवडून देण्याची व्यवस्था केली जाऊ शकते. देशात अशा 180 जागा आहेत, जिथे मतदारांची संख्या 18 लाखांपेक्षा जास्त आहे. महिला आरक्षणाची मागणी सर्वच पक्ष करत आहेत. सरकारने हे पाऊल उचलले तर 2024 पर्यंत सरकारसाठी हे मोठे पाऊल असेल. वन नेशन-वन इलेक्शन किंवा वन कंट्री-वन इलेक्शन म्हणजे संपूर्ण देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घ्याव्यात. स्वातंत्र्यानंतर 1952, 1957, 1962 आणि 1967 मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या, परंतु 1968 आणि 1969 मध्ये अनेक विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्या. त्यानंतर 1970 मध्ये लोकसभाही विसर्जित करण्यात आली. त्यामुळे एक देश, एक निवडणुकीची परंपरा खंडित झाली. मे 2014 मध्ये केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आले तेव्हा काही काळानंतर एक देश एक निवडणूक असा वाद सुरू झाला.

### वन नेशन-वन इलेक्शन म्हणजे काय ?

» वन नेशन-वन इलेक्शन किंवा वन कंट्री-वन इलेक्शन म्हणजे संपूर्ण देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घ्याव्यात. स्वातंत्र्यानंतर 1952, 1957, 1962 आणि 1967 मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या, परंतु 1968 आणि 1969 मध्ये अनेक विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्या. त्यानंतर 1970 मध्ये लोकसभाही विसर्जित करण्यात आली. त्यामुळे एक देश, एक निवडणुकीची परंपरा खंडित झाली.

# लखनऊत केंद्रीय मंत्र्यांच्या घरी तरुणाची हत्या!

## मुलाच्या पिस्तुलाने मित्रावर झाडली गेली गोळी : कौशल किशोर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लखनऊमधून एक मोठी बातमी आहे. येथे केंद्रीय मंत्री कौशल किशोर यांच्या घरी एका तरुणाची डोक्यात गोळी झाडून हत्या करण्यात आली. मंत्र्यांच्या मुलाच्या पिस्तुलाद्वारे हा गुन्हा घडला. घरात रक्ताने माखलेला मृतदेह आढळला. विनय श्रीवास्तव असे मृत तरुणाचे नाव आहे. मंत्री कौशल किशोर यांचा मुलगा विकास ऊर्फ आशू याचा तो मित्र आहे.**



डीसीपी राहुल राज यांनी सांगितले की, रात्री 6 लोक मंत्र्यांच्या मुलाच्या घरी आले होते. रात्री उशिरापर्यंत खाणेपिणे सुरू होते. त्यानंतर ही घटना घडली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. यानंतर मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. तरुणाच्या डोक्यावर जखमेच्या खुणा आहेत. एक पिस्तूलही सापडले आहे. हे पिस्तूल विकास किशोरचे असल्याचे सांगितले जात आहे. हत्येचे कारण शोधले जात आहे. विनय श्रीवास्तव हे भाजपचे कार्यकर्ते होते. लखनऊच्या दुबग्गा येथे ज्या घरात ही घटना घडली ते मंत्रीपुत्र विकास किशोर यांचे आहे. ते वडिलांपासून वेगळ्या घरात एकटेच राहत होते. घटनेची माहिती मिळताच कौशल किशोर हेही घटनास्थळी पोहोचले. तेथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, घटनेच्या वेळी त्यांचा मुलगा घरी नव्हता. यावर कौशल किशोर म्हणाले की, मला हे माहीत नाही. मुलगा आशू काल दिल्लीला गेला होता. एका व्यक्तीची तब्येत बिघडली होती. तो विमानाने येत आहे. विनय कधीपासून होता तुमच्या सोबत? उत्तर देताना मंत्री म्हणाले की, मृत व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय माझ्या खूप जवळचे आहेत. 2017 च्या विधानसभा निवडणुकीपासून विनय आमच्यासोबत राहिला होता. या दुःखाच्या प्रसंगी मी त्यांच्यासोबत आहे. यात कोण-कोण सहभागी आहेत, याचा आता पोलीस तपास करत आहेत. उत्तर देताना मंत्री म्हणाले की, हा तपासाचा विषय आहे. जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल. आम्ही कुटुंबीयांसोबत आहोत. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार खून कोणत्या परिस्थितीत झाला हे पाहतील? हा तपासाचा विषय आहे.

### मंत्र्यांनी आपल्याच सरकारला घेरले

» बुधवारी केंद्रीय राज्यमंत्री कौशल किशोर यांनी सर्वोच्च प्राधान्य असलेल्या कामांची आणि कायदा व सुव्यवस्थेची आढावा बैठक घेतली होती. यामध्ये त्यांनी आपल्याच सरकारमधील विभागांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. लखनऊ विकास प्राधिकरण म्हणजेच एलडीए आणि लेसा यांच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त करत दोन्ही विभागांना लुटीचा अड्डा असे संबोधण्यात आले. 17 सप्टेंबरनंतर प्रत्येक विधानसभा मतदारसंघात LDA आणि LESA ग्रस्त लोकांची सुनावणी घेण्यात येईल, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

दुसरीकडे, मृत विनय श्रीवास्तवच्या कुटुंबीयांनी ठाकूरगंज पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. अजय रावत, शमीम, अंकित आणि बाबा हे मंत्र्यांच्या घरात राहत असल्याचा उल्लेख आहे. मृताचा भाऊ विकास सांगतो की, आम्हाला रात्री उशिरा माहिती मिळाली की, आम्ही लवकर किशोरच्या घरी पोहोचलो. माझ्या धाकट्या भावाने ही माहिती दिली होती. विकासने सांगितले की, मी किशोरच्या घरी पोहोचलो तेव्हा माझा भाऊ जमिनीवर पडला होता. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता आणि त्याच्या डोक्यात गोळ्या लागल्या होत्या. हत्येचा संशय असलेल्यांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# माझा कारभार सोपा नसतोय रं...

भल्या भल्या मराठी सेलिब्रेटींपेक्षा जिच्या नावाला प्रेक्षकांची पसंती मिळते, जिची लोकप्रियता यशाच्या शिखरावर आहे त्या गौतमीच्या नावाची क्रेझच वेगळी आहे. अल्पावधीतच गौतमीनं तिच्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या काही दिवसांपासून गौतमीनं तिच्या नावाचा ब्रँड तयार केला आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये गौतमीचे होणारे कार्यक्रम त्या कार्यक्रमांना होणारी गर्दी आणि तिच्या त्या डान्स शो ला मिळणारा प्रतिसाद प्रचंड मोठा असल्याचे दिसून आले आहे. आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी गौतमीच्या नृत्याचे कार्यक्रम



आयोजित करण्यात आले तिथे प्रेक्षकांनी गदारोळ केल्याचेही सांगण्यात येते. गौतमी ही सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. तिच्या फोटो आणि व्हिडिओला मिळणारा प्रतिसादही मोठा असतो. गौतमीनं एखादा फोटो पोस्ट केल्यास त्यावर येणाऱ्या कमेंटस हा तिच्या चाहत्यांसाठी खास चर्चेचा विषय असतो. गौतमी जेवढी लोकप्रिय आहे तेवढीच तिच्यावर होणारी टीकाही लक्ष वेधून घेत असते. गौतमीचा डान्स, तिचा अंगविक्षेप, हावभाव यामुळे ती अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे दिसून आले आहे. आता गौतमी चर्चेत आली आहे ते तिच्या नव्या व्हिडिओमुळे. गौतमीचं नव्या गाण्याचा टीझर आता समोर आला आहे.

# टायगर श्रॉफचा शानदार डान्स!

उत्तर प्रदेश राज्यात प्रथमच खेळल्या जात असलेल्या UP T-20 लीगच्या उद्घाटन समारंभात अभिनेत्री अमिषा पटेल, अभिनेता टायगर श्रॉफ आणि मीत ब्रदर्स यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. हा सोहळा पाहण्यासाठी बुधवारी हजारो लोक ग्रीन पार्क स्टेडियमवर पोहोचले. 1 तास चाललेल्या या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन अभिनेता मनीष पॉलने केले. या स्टार्सनी लीग ट्रॉफीचे उद्घाटनही केले. यानंतर लीगचा पहिला सामना नोएडा सुपर किंग्ज आणि कानपूर सुपरस्टार्स यांच्यात झाला. यामध्ये नोएडाने कानपूरचा 16 धावांनी पराभव केला. नोएडाने 20 षटकांत 5 गडी गमावून 169 धावा केल्या. प्रत्युत्तरात कानपूर संघाला 20 षटकांत 8 गडी गमावून केवळ 153 धावा करता आल्या. कानपूरमध्ये संध्याकाळी 5:45 वाजता अभिनेत्री अमिषा पटेलच्या परफॉर्मन्सने उद्घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. अमिषाने सर्वप्रथम मैदानात फिरून प्रेक्षकांचे स्वागत केले. तिला पाहून प्रेक्षकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. तिने माईक हातात घेताच, अमीषाने गदर-2 चित्रपटातील सर्वात प्रसिद्ध संवाद... हिंदुस्तान झिंदाबाद है, जिंदाबाद था आणि जिंदाबाद रहेगा म्हटला हे ऐकताच उपस्थितांनी हिंदुस्थान झिंदाबादच्या घोषणा दिल्या. यानंतर अभिनेत्रीने मैं निकला गड्डी लेकर, कहो ना प्यार हैसह अनेक गाण्यांवर धमाकेदार डान्स केला. अमिषा निघताच मीत ब्रदर्सने परफॉर्म केले. दिल गलती कर बैठा है गाणे गाऊन त्यांनी मैदानात बसलेल्या प्रेक्षकांना नाचायला भाग पाडले. यानंतर मंचावर आलेल्या बॉलीवूड सुपरस्टार टायगर श्रॉफने जय-जय शिवशंकर आणि मेरे नाल तू सिटी बजा आदी गाण्यांवर नृत्य करून संपूर्ण रिंगणात खळबळ उडवून दिली. त्यानंतर टायगर चीअरलीडर्ससह मैदानात फिरला.



# रुबिना दिलायक होणार आई!



अभिनेत्री रुबिना दिलायक सध्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. ती प्रेग्नंट असून जानेवारी 2024 च्या सुरुवातीला अशी बातमी अनेक दिवसांपासून समोर येत आहे. मात्र, अभिनेत्री किंवा तिचा पती अभिनव शुक्ला यांच्याकडून वृत्ताबाबत अद्याप काहीही दुजोरा देण्यात आलेला नाही. हिंदुस्तान टाइम्सच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दाम्पत्यांच्या नीकटवर्तींनी म्हटले की, अभिनेत्री चार महिन्यांची गर्भवती असून तिची प्रसूती पुढच्या वर्षी होणार आहे. पण या जोडप्याला त्यांचे वैयक्तिक आयुष्य खाजगी ठेवायचे आहे, म्हणून रुबिना हा विषय प्रसिद्धीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. सध्या ती तिच्या आयुष्यातील या नव्या टप्प्याचा आनंद घेत आहे. लाइमलाइटपासून दूर राहण्यासाठी, रुबिना आणि तिचा पती अभिनव शुक्ला दीर्घ सुट्टीवर यूएसला गेले आहेत, तिथे दोघेही चांगला वेळ घालवत आहेत. रुबिनाच्या गरोदरपणाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या, त्यानंतर अभिनेत्री मॅटर्निटी क्लिनिकच्या इमारतीबाहेर दिसली. याशिवाय रुबिनाने 26 ऑगस्टला वाढदिवसाचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये अभिनेत्रीचे बेबी बंप दिसत आहे. त्यामुळे रुबिनाच्या गरोदरपणाबद्दलच्या चर्चांना पुन्हा एकदा जोर आला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रुबिनाच्या जवळच्या एका सूत्राने सांगितले की, काही काळापूर्वी तिला एका टीव्ही शोची ऑफर आली होती, परंतु तिने प्रेग्नेंसीमुळे हा शो नाकारला होता. रुबिनाला तिच्या आयुष्यातील हा टप्पा एन्जॉय करायचा आहे, त्यामुळे ती काम आणि लाइमलाइटपासून दूर आहे. एवढेच नाही तर ती आजकाल मित्रांना आणि जवळच्या लोकांनाही भेटत नसल्याचे सूत्रांनी सांगितले. रुबिनाने 2018 मध्ये अभिनव शुक्लासोबत लग्न केले. लग्नानंतर काही काळानंतर दोघांमध्ये मतभेद झाल्याच्या बातम्याही समोर आल्या होत्या. मात्र, त्यानंतर दोघे बिग बॉस सीझन 14 मध्ये एकत्र दिसले होते. शो दरम्यान अभिनेत्रीने सांगितले होते की, काही गोष्टींमुळे तिच्या आणि अभिनवमध्ये मतभेद झाले होते, दोघांनाही घटस्फोट घ्यायचा होता. तथापि, या जोडप्याने त्यांच्या नात्याला आणखी एक संधी दिली. दोघांमध्ये तेव्हापासून सर्व काही ठिक आहे.

# सईनं चाहत्यांना दिली गूडन्यूज!



मराठी मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध आणि चर्चेतली अभिनेत्री म्हणुन सई ताम्हणकरचं नाव नेहमीच आघाडीवर असतं. सई नेहमी तिच्या वेगळेपणासाठी ओळखली जाते. तिनं मराठी मनोरंजनसृष्टीबरोबरच बॉलिवूडमध्येही धमाकेदार अभिनयानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहे. ती नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. सई ही अभिनयाबरोबरच सोशल मिडियावरही सक्रिय असते. ती नेहमीच चाहत्यांच्या संपर्कात राहते. सईनं आता तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेयर केला आहे ज्यात तिने तिच्या चाहत्यांसोबत एक मोठी आनंदाची बातमी शेयर केली आहे. खर तर सईनं एक व्हिडिओ शेयर केला आहे ज्यात तिने तिच्या नवीन घरात गृहप्रवेश केला आहे. या व्हिडिओत ती म्हणतेय की, 'तिला या घरातून जायचं नाही, तिला माहिती आहे ते घर मोठ मस्त आहे पण काही गोष्टी सुटत नाहीत, तसचं काहीस या घराबद्दल आहे. या घराने तिला खुप काही दिलयं ती ते नाही सोडू शकत..' या व्हिडिओत सई तिच्या पुर्वीच्या घरातून सामान शिफ्ट करतेय. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलयं, "द एलेव्हन्थ प्लेस. पुन्हा घाबरून आणि उत्साहाने, मी नवीन घरात पाऊल ठेवले, एक स्वप्न पूर्ण झाले, माझं पहिलं मुंबईतील घर, एक मैलाचा दगड गाठला, घरी बोलावण्याचं ठिकाण, जिथे आठवणी विणल्या जातील.

# भारत पाकिस्तान सामना रद्द ?

## » आशिया कप महामुकाबल्यावर पावसाचे सावट


नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषक २०२३ मधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सर्वात मोठ्या सामन्यांपैकी एक शनिवारी कँडी येथील पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर, पावसाचा मोठा धोका आहे. श्रीलंकेच्या दक्षिण भागात पुढील काही दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती आशियाई क्रिकेट परिषदेला (ACC) कळवण्यात आली आणि परिणामी, कँडीच्या जागी डंबुलाला पर्यायी ठिकाण म्हणून ऑफर करण्यात आले आहे.**

शनिवारच्या हवामान अहवालानुसार, पावसाची ७० टक्के शक्यता आहे, त्यामुळे सामना होण्याची शक्यता कमी आहे. भारताचे पुढील दोन सामने, पाकिस्तान आणि नेपाळ विरुद्ध शनिवार आणि सोमवारी कँडी येथे होणार आहेत.

हवामान खात्याच्या मते, कँडीमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान दरम्यान पावसाची शक्यता सध्या ७० टक्के आहे. दुपारी २.३० वाजता (सामना सुरू होण्याच्या अर्धा तास आधी) पाऊस पडणे अपेक्षित आहे ज्यामुळे नाणेफेक आणि अखेरीस सामना उशीर होऊ शकतो आणि जर पाऊस सुरू राहिला तर सामना रद्द होण्याचीही शक्यता आहे.

यंदाचा आशिया चषक ही ५० षटकांची स्पर्धा आहे आणि ग्राउंड स्टाफला सामना पूर्ण होईल याची तयारी करण्यासाठी भरपूर वेळ मिळेल. सामन्यात पावसाने व्यत्यय आणल्यास, दोन्ही बाजूंकडील संघांना हे २० षटकांच्या लढतीसाठी तयार राहा, असेही सांगण्यात आले आहे. मात्र, तरीही जर हे शक्य झाले नाही तर भारत आणि पाकिस्तानमध्ये गुणांची विभागणी होईल.



पाकिस्तान आपोआप सुपर ४ टप्प्यात प्रवेश करेल, कारण त्यांनी अ गटातील इतर संघ नेपाळला आधीच पराभूत केले आहे. भारताला पुढच्या फेरीत जाण्यासाठी नेपाळला त्यांच्या गट सामन्यात पराभूत करावे लागेल. शनिवारी भारत विरुद्ध पाकिस्तान गट अ सामन्याच्या आधी, होम टीम श्रीलंका त्याच ठिकाणी गुरुवारी ब गटातील सामन्यात बांगलादेशविरुद्ध आशिया चषक मोहिमेची सुरुवात करत आहे.

इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, पाऊस आणि ओल्या आउटफिल्डमुळे त्यासामन्याला सुरु करायला खूप अडचणी आल्या. अधून-मधून काही पावसाच्या सरी देखील त्या सामन्यात येत आहेत. गेले तीन दिवस संततधार पाऊस आणि खराब हवामानामुळे मैदान तयार करणे मैदानातील कर्मचाऱ्यांना अवघड झाले होते. मात्र, एक चांगली बातमी आहे की सकाळच्या चित्रांमध्ये चमकदार सूर्यप्रकाश दिसला.

मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर २०१९ साली झालेल्या ICC क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान विरुद्ध भारताचा शेवटचा एकदिवसीय सामन्यात पावसाने खोडा घातला होता. मँचेस्टरमधील त्या सामन्यात भारताने DLS पद्धतीने ८९ धावांनी विजय मिळवला होता.

### कँडी मधील हवामान परिस्थिती

» भारताचे पुढील दोन सामने, पाकिस्तान आणि नेपाळ विरुद्ध शनिवार आणि सोमवारी कँडी येथे होणार आहेत. हवामान खात्याच्या मते, कँडीमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान दरम्यान पावसाची शक्यता सध्या ७० टक्के आहे. दुपारी २.३० वाजता (सामना सुरू होण्याच्या अर्धा तास आधी) पाऊस पडणे अपेक्षित आहे ज्यामुळे नाणेफेक आणि अखेरीस सामना उशीर होऊ शकतो आणि जर पाऊस सुरू राहिला तर सामना रद्द होण्याचीही शक्यता आहे.

# श्रीलंकेने बांगलादेशचा पाच विकेट्सने उडवला धुव्वा!

## » सलग 11वी वनडे जिंकली; समरविक्रमा-असलंकांची फिफ्टी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**गतविजेत्या श्रीलंकेने आशिया चषक-2023 मधील आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली आहे. ब गटातील पहिल्या सामन्यात संघाने बांगलादेशचा 5 गडी राखून पराभव केला. श्रीलंकेचा या वर्षातील वनडेतील हा सलग 11वा विजय आहे. एवढेच नाही तर वनडे आशिया चषक स्पर्धेतही संघाने तब्बल 9 वर्षांनंतर बांगलादेशवर विजय मिळवला आहे.**



एकदिवसीय आशिया कपमध्ये श्रीलंकेचा शेवटचा विजय 2014 मध्ये मीरपूरच्या मैदानावर होता. पल्लेकेले क्रिकेट स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशचा संघ 42.4 षटकांत सर्वबाद 164 धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात श्रीलंकेच्या फलंदाजांनी 39 षटकांत 5 गडी गमावून 165 धावांचे लक्ष्य गाठले. श्रीलंका संघाचा या वर्षात वनडेत सलग 11वा विजय आहे. संघाचा शेवटचा पराभव 2 जून रोजी हंबनटोटा येथे अफगाणिस्तानविरुद्ध झाला होता.

या संघाने अफगाणिस्तान-नेदरलँड्सचा प्रत्येकी 2-2 आणि बांगलादेश, आयर्लंड, ओमान, स्कॉटलंड, यूएई, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजचा प्रत्येकी एकदा पराभव केला. सदीरा समरविक्रमाने वनडे कारकिर्दीतील चौथे अर्धशतक झळकावले. त्याने 54 धावांची खेळी खेळली. समरविक्रमाने 77 चेंडूत 70.13 च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. त्याच्या खेळीत 6 चौकारांचा समावेश होता. 165 धावांच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या संघाची सुरुवात खराब झाली. संघाचे सलामीवीर केवळ 15 धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले. संघाने 43 धावांवर तिसरी विकेटही गमावली. येथून सदीरा समरविक्रमा आणि चारिथ असलंका यांनी श्रीलंकेचा डाव सांभाळला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी पन्नासची भागीदारी केली. समरविक्रमानेही 60 चेंडूत 50 धावा केल्या. बांगलादेशच्या नजमुल हुसेन शांतोने 89 धावांची खेळी केली. उर्वरित फलंदाजांना काही विशेष कामगिरी करता आली नाही.

श्रीलंकेकडून मथिश पाथिरानाने चार बळी घेतले. महिष तेक्षानाने दोन गडी बाद केले. नजमुल हसन शांतोने 89 धावांची अर्धशतकी खेळी खेळली. त्याने वनडे कारकिर्दीतील तिसरे अर्धशतक झळकावले. शांतोने 122 चेंडूंच्या खेळीत 72.95 च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. त्याने 7 चौकार मारले.

36 धावांत तीन गडी गमावल्यानंतर नझमुल हसन शांतो आणि तौहीद हार्डोय यांनी बांगलादेशी डावाची धुरा सांभाळली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी 80 चेंडूत 59 धावांची भागीदारी केली. ही भागीदारी दासून शनाकाने मोडली. त्याने तौहीनला एलबीडब्ल्यू केले. पॉवरप्लेमध्ये बांगलादेशचा खेळ सरासरीचा होता. संघाने 10 षटकांत 34 धावा करताना सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. पदार्पण सामना खेळणारा तनजीद हसन शून्य आणि मोहम्मद नईम १६ धावा करून बाद झाला. महिष टीक्षाना आणि धनंजय डी सिल्वा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

### बांगलादेशचा संघ 164 धावांत गारद

» या सामन्यात बांगलादेशची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली, परंतु या संघासाठी सर्वात मोठी खेळी नझमुल हुसैन शांतोने खेळली. त्याने १२२ चेंडूत ७ चौकारांच्या मदतीने ८९ धावा केल्या. कर्णधार शकिब अल हसनने केवळ ५ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर इतर फलंदाजांनीही फारसे काही चांगली कामगिरी केली नाही. ९५ च्या स्कोअरवर ४ विकेट्स गमावलेल्या बांगलादेशच्या डावाला शांतोसह मुशफिकुर रहीमने नेण्याचा प्रयत्न केला, पण तोही १३ च्या वैयक्तिक स्कोअरवर पॅव्हेलियनमध्ये परतला. येथून श्रीलंकेच्या गोलंदाजांनी दडपण कायम ठेवत बांगलादेशचा डाव गुंडाळण्यास फारसा वेळ लावला नाही. शांतो १२२ चेंडूत ८९ धावांची खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला, तर बांगलादेशचा संपूर्ण संघ ४२.४ षटकांत १६४ धावांत गारद झाला.